# जनसंपर्क अधिकारी

**पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय**

**रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे**

**फोन नं. ०२२-२९४५१००१**

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेसनोट क्र. ३२७** **दिनांक २०/११/२०२१**

## मानवी हक्क आयोगाचे अधिकारी असल्याचे भासवून खंडणी वसूल करणा-या दोन आरोपीतांस अटक.

तक्रारदार श्री. रमेश सुर्यप्रसाद वर्मा, वय ३२ वर्षे यांचे किराणा व रेशनिंगचे दुकान असून त्यावर ते आपले परिवाराचा उदरनिर्वाह करतात. दिनांक ०५.११.२०२१ रोजी १७.४५ वा. चे सुमारास तक्रारदार यांचे शॉपवर एक अनोळखी महिला व पुरुष यांनी येऊन तक्रारदार यांना ते नॅशनल ह्युमन राईटचे शासकीय अधिकारी आहेत असे बोलुन त्यांनी त्यांची नावे १) शबानाबानो बल्लुभाई सिध्दीकी रा. मुंबई २) प्रशांत गंगा विष्णू, रा. मुंबई अशी सांगितली. त्यानंतर नमुद इसमांनी तक्रारदार यांना "तुम लोगोको रेशनिंग कैसे बाटते हो, तुम्हारा कम्प्लेंट बुक दिखाओ, हमे चेकींग करना है," असे बोलले. मात्र तक्रारदार यांचे कम्प्लेट बुक हे नेहमी रेशनिंग अधिकारी तपासणी करीत असल्याने व त्यांचे दुकानावर आलेले इसम हे यापुर्वी आले नसल्याने सदरचे बुक त्यांचे हातात देण्यास तक्रारदार यांनी नकार दिला. नमुद इसमांनी तक्रारदार यांना आम्ही सुध्दा शासकीय अधिकारी आहोत, कम्प्लेट बुक दाखविली नाही तर तुमच्याविरुध्द केस करु तसेच आम्ही इतर रेशनिंग दुकानावरील कम्प्लेट बुक तपासणी केली आहे त्यांनी आम्हाला फी दिल्याने आम्ही त्यांच्यावर केस केलेली नाही. त्यानंतर सदरील अनोळखी इसमांनी तक्रारदार यांचेविरुध्द कोणतीही केस करणार नाहीत त्याबदल्यात त्यांची फी म्हणुन ५०,०००/- रु. ची मागणी केली. त्यावेळी तक्रारदार हे घाबरल्याने व त्यांच्या गल्ल्यात केवळ २०,०००/- रु. जमा असल्याने ती रक्कम सदरच्या अनोळखी इसमांना दिली. त्यानंतर सदरील अनोळखी इसम हे तक्रारदार यांना उर्वरीत ३०,०००/- रु. रक्कम एका आठवड्याचे आत दे, नाहीतर केस करु असे बोलुन निघुन गेले होते. सदरबाबत तक्रारदार यांनी पोलीस नवघर ठाण्यात तक्रारी अर्ज दिला होता. तक्रारदार यांचे अर्जाची चौकशी करीत असतांना त्यांनी दिलेल्या तक्रारीवरुन दि. १९.११.२०२१ रोजी नवघर पोलीस ठाणे गुन्हा रजि. नं. I ७८७/२०२१ भा.दं.वि.सं.कलम ३८४, ४१९, १७०, ३४ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला होता.

वरील प्रमाणे दाखल गुन्हयाचे अनुषंगाने तपास करीत असतांना आरोपी १) श्रीमती शबानाबानो बल्लुभाई सिध्दीकी, वय ३० वर्ष, सांताक्रुज पश्चिम, मुंबई मुळ रा. उत्तरप्रदेश व २) प्रशांत गंगा विष्णु, वय २७ वर्ष, रा. म्हाडा बिल्डींग, पिनाकोला टॉवर समोर, बस स्टॉप नं.१५, मिरा रोड, पुर्व जि. ठाणे मुळ रा. उत्तरप्रदेश यांना ताब्यात घेवुन अटक करण्यात केली आहे. नमुद आरोपीतांकडुन हुमन राईटचे नावाने असलेले ओळखपत्र प्राप्त केले असुन त्यावर National Human Rights & Social Justice Commission (GOVT.OF NCT DELHI) असे नमुद केले आहे. तसेच National Human Rights & Social Justice Commission A National Level Civic & Autonomous Body Head Quarter New Delhi, The Social Justice for Every Human अशा हेडचे लेटर हेड आणि मिरा-भाईंदर पसिरातील शिधावाटप कार्यायल क्र. ४१ फ उप-भाईंदर विभागातील अधिकृत शिधावाटप दुकानांच्या नावांची यादी मिळुन आलेली आहेत.

आरोपीतांनी मिरारोड व भाईंदर पोलीस ठाणे हद्दितील रेशनिंग दुकानदार यांना धमकाविल्याचे प्राथमीक तपासात माहिती मिळुन आलेली आहे.

सदरची कामगिरी श्री. अमीत काळे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-०१, डॉ. शशीकांत भोसले, सहा.पो.आयुक्त, नवघर विभाग यांचे मार्गदर्शनाखाली श्री. मिलिंद देसाई, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, नवघर पोलीस ठाणे, पोनि/प्रकाश मासाळ(गुन्हे) पोउनि/भगवान पाटील यांनी केलेली आहे.

---------------ooooo----------------